**MHTH270013702024**

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | - | ०५/१०/२००७ |
| नोंदणी दिनांक | - | ०५/१०/२००७ |
| पुर्ननोंदणी दिनांक | - | ३०/०७/२०२४ |
| निकाल दिनांक | - | ०४/०७/२०२५ |
| कालावधी | - | वर्षे महिने दिवस<br>१७ ०८ २९ |

**निशाणी ४४**

**जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बेलापूर, नवी मुंबई**
**जि. ठाणे**
**(पीठासीन अधिकारी श्री. मकरंद आर. मांडवगडे)**

**सेशन केस क्र. १२३/२०२४**
**जुना आरसीएस केस क्र.८०१/२००७**

महाराष्ट्र सरकार
( एनआरआय सागरी पोलीस स्टेशन
गु. र. नं. २३/२००७) ... फिर्यादी

**विरुध्द**

सुकुमार अन्नाप्पा किल्लेदार.
वय – ४४ वर्षे, व्यवसाय- सिव्हील कॉन्ट्रॅक्टर.
रा. - भक्ती अव्हेन्यु, प्लॉट नं ३बी,
रुम नं.३०१, सेक्टर ४६, नेरुळ, नवी मुंबई ... आरोपी

**दोषारोप - भारतीय दंड विधान कायदा १८६० चे कलम ३५३, ३४१ अन्वये.**

---

फिर्यादीतर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती संध्या म्हात्रे.
आरोपीतर्फे वकील श्री. एस.बी. रामकर

---

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ३१/०३/२००७ |
| पहिली खबर तारीख | ०६/०४/२००७ |
| दोषारोप दाखल तारीख | ०५/१०/२००७ |
| आरोपीविरुध्द चार्ज तयार केल्याची तारीख | १३/०२/२०२५ |
| प्रथम पुरावा सुरु केल्याची तारीख | २१/०३/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०४/०७/२०२५ |
| शिक्षेचा आदेश असल्यास त्याची तारीख | -- |

**आरोपीचा तपशील -**

| **आरोपीचे नाव** | **अटक तारीख** | **जामीनावर सोडल्याची तारीख** | **कोणत्या कलमानुसार दोषारोप ठेवला आहे** | **निर्दोष मुक्त केले अथवा शिक्षा झाली** | **कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये कारागृहात व्यतीत केलेला कालावधी** |
|---|---|---|---|---|---|
| सुकुमार अन्नाप्पा किल्लेदार | ०४/०६/२००७ | ०८/०४/२००७ | भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३५३, ३४१. | निर्दोष मुक्तता. | -- |

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी -**

| **अनुक्रमांक** | **नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १ | शंकर रामचंद्र पवार | ३१ | फिर्यादी |
| २ | श्री. सुबोध कमलाकर मुळे | ३६ | साक्षीदार |
| ३. | श्री. संभाजी हरी साळोखे | ४० | तपास अधिकारी |

## अभियोग पक्ष / बचाव पक्षातर्फे निशाणी दिलेल्या कागदपत्रांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अनु. क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| १ | ३२ | दिनांक १८/०१/२००७ रोजीची कोकण विभागीय आयुक्ताने दिलेली अधिसुचना. |
| २ | ३३ | फिर्याद |
| ३ | ३४ | मुद्रित प्रथमवर्दी |
| ४ | ४१ | दिनांक ०६/०४/२००७ रोजीचा घटनास्थळ पंचनामा |

### ब. बचाव पक्षातर्फे निशाणी दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अनु.क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| | .... | .... |

### क. न्यायालयातर्फे देण्यात आलेले निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| १ | २८ | दोषारोप |
| २ | ४३ | आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसारचा जबाब. |

### ड. मुद्देमाल (आर्टीकल)

| अनु.क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| १ | आर्टीकल अ | दि. १८/१२/२००६ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेचे पत्र झेरॉक्स प्रत |
| २ | आर्टीकल ब | सिडको व नवी मंबई महानगरपालिकेमध्ये झालेल्या लीज अग्रीमेंटची झेरॉक्स प्रत. |
| ३ | आर्टीकल क | आयव्हीआरसीएल कंपनीला दिलेल्या आदेशाची झेरॉक्स प्रत |
| ४ | आर्टीकल ड | दि. १४/०२/२००७ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेने तहसिलदार कार्यालयास दिलेले खुलासा पत्र |

# : न्यायनिर्णय :

(घोषित दिनांक ०४/०७/२०२५ )

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३५३, ३४१ अन्वये दंडित अपराधांकरीता प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाच्या कथनानुसार नवी मुंबई महानगरपालीका मुख्यालय इमारतीच्या बांधकामासाठी सिडकोने प्लॉट नं.१, सेक्टर नं.१५ ए, सीबीडी–बेलापूर येथे २०००० चौ मी क्षेत्रफळाचा भूखंड हस्तांतरीत केला होता. सदर इमारतीच्या बांधकामासाठी निविदा काढण्यात आल्या व त्यानुसार सदर बांधकामासाठी आय. व्ही. आर. सी. एल. कंपनीला कंत्राट देण्यात आले. त्यानुसार सदर बांधकामासाठी सदर कंपनीने तेथील जमीनीचे सपाटीकरण व भराव घालण्याचे काम हाती घेतले होते. सदर कामकाज चालु असतांना आरोपी सुकुमार किल्लेदार यांनी सदर भूखंडावरील चालु असलेले काम हे बेकायदेशीर असुन ते खारफुटी झाडे नष्ट करुन करण्यात येत आहे त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाला आहे अशा आशयाची तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित विभागाचे तहसिलदार, सिडको तसेच नवी मुंबई महानगरपालीकेच्या अधिका–यांनी संयुक्त पाहणी केली असता महानगरपालीकेच्या इमारतीच्या भूखंडापासून दूर खारफुटीची काही झाडे तोडल्याचे निदर्शनास आले परंतू सदर खारफुटी झाडे तोडण्याचा संबंधीत बांधकामाशी काहीएक संबंध नाही असे संबंधित अधिका–यांना निदर्शनास आले. त्यामुळे आय व्ही आर सी एल कंपनीतर्फे महानगरपालीका मुख्यालय इमारतीच्या पुढील बांधकामाची कार्यवाही पुर्ववत सुरु करण्यात आली.

३. वर नमुद केल्यानुसार पुढील बांधकाम पुर्ववत करण्यात आल्यानंतर दिनांक ३१/०३/२००७ रोजी आरोपी सुकुमार किल्लेदार व तीन अनोळखी व्यक्तीनी सदर महापालीकेच्या भूखंडावरील भराव घालण्याचे कामात अडथळा आणुन भराव टाकणारे डंपर क्र. एम एच ०४ सी ६९८५ व एम एच ०४ पी ४८८१ या क्रमांकांचे दोन डंपर व एम एच ४३ एफ २३१३ या क्रमांकाचे पिकअप वाहन पोलीस स्टेशनला आणुन

जमा केले. त्यामुळे सदर बांधकाम थांबले. सदर घटनेची माहिती सदर बांधकामाच्या ठिकाणावरील आय. व्ही. आर. सी. एल. कंपनीचे अभियंता श्री पेडणेकर यांनी नवी मुंबई महानगरपालीकेच्या अधिका–यांना दिल्यानंतर सदर महानगरपालीकेचे कार्यकारी अभियंता शंकर रामचंद्र पवार यांनी आरोपीविरुध्द एनआरआय सागरी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

४. वर नमुद फिर्याद प्राप्त होता एनआरआय सागरी पोलीसांनी भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३५३, ३४१ नुसार दंडित अपराधांकरीता आरोपीविरुध्द गुन्हा क्र.२३/२००७ नोंदविला. त्यानंतर सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक एस. एच साळोखे यांच्याकडे सोपविण्यात आला. सदर तपासात त्यांनी घटनास्थळाला भेट देवून घटनास्थळ पंचनामा तयार केला तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्याचप्रमाणे त्यांनी सदर भूखंडाच्या संदर्भातील कागदपत्रे गोळा केली. एकुण तपासाअंती आरोपीने फिर्यादी लोकसेवकाच्या शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला असे त्यांना तपासाअंती आढळुन आल्यामुळे त्यांनी आरोपी सुकुमार किल्लेदार याचेविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३५३, ३४१ नुसार दंडित अपराधांकरीता न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

५. निम्न साक्षांकिताने त्यानंतर निशाणी २८ वर आरोपी सुकुमार किल्लेदार विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३५३, ३४१ नुसार दंडित अपराधांकरीता दोषारोप ठेवला. सदर दोषारोपातील मजकूर आरोपीस समजावून सांगता त्याने गुन्हा केल्याचे नाकारुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीचा संपूर्ण बचाव हा नकाराचा व त्यास खोटया प्रकरणात गुंतविण्यात आले अशा स्वरुपाचा आहे.

६. उभय पक्षांना ऐकले. एकूण वस्तुस्थिती व परिस्थिती खालील नमुद मुद्दे माझ्या विचारार्थ येतात. सदर मुद्दयांवर मी माझा निष्कर्ष नोंदवून सदर निष्कर्षाप्रत मी का आलो त्याची कारणमिमांसा पुढे देत आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक ३१/०३/२००७ रोजी दुपारी १२.०० वाजेच्या सुमारास प्लॉट नं १, सेक्टर १५ अ, सीबीडी बेलापुर येथील नवी मुंबई महानगरपालीकेच्या बांधकामाच्या ठिकाणावर साक्षीदार रवि सदाशिव पेडणेकर, अभियंता हे लोकसेवक म्हणून कर्तव्य बजावत असतांना व त्यांच्या कर्तव्याचा भाग म्हणून सदर बांधकामाच्या ठिकाणी भराव घालण्याचे काम करीत असतांना आरोपी सुकुमार अन्नाप्पा किल्लेदार याने सदर कामास प्रतिबंध करुन ते काम बंद पाडले व सदर बांधकामाच्या ठिकाणावरील कामकाजाची वाहने– एम एच ०४ सी ६९८५ व एम एच ०४ पी ४८८१ या क्रमांकांचे दोन डंपर व एम एच ४३ एफ २३१३ या क्रमांकाचे पिकअप वाहन जोरजबरदस्तीने तेथून घेवून गेले व त्यायोगे साक्षीदार रवि सदाशिव पेडणेकर, अभियंता हे लोकसेवक म्हणून कर्तव्य बजावत असतांना त्यांना रोखण्याच्या हेतूने त्यांच्या कर्तव्याच्या कायदेशीर पालनात फौजदारी बळजबरी केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतात का ? | .. नकारार्थी |
| २ | वर नमुद ठिकाणी व वेळेस आरोपीने साक्षीदार रवि सदाशिव पेडणेकर, अभियंता हे नवी मुंबई महानगरपालीकेच्या बांधकामाच्या ठिकाणी भराव घालण्याचे काम करीत असतांना आरोपी सुकुमार अन्नाप्पा किल्लेदार याने सदर काम करण्यास प्रतिबंध करुन व तेथे काम करणारी वर नमुद वाहने ही तेथून इतरत्र नेवून साक्षीदार रवि सदाशिव पेडणेकर यांना त्यांच्या कामात चुकीच्या पद्धतीने प्रतिबंध केला हे अभियोग पक्ष सिध्द करतात का ? | .. नकारार्थी |
| ३ | आदेश काय ? | ..अंतिम आदेशानुसार आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## – कारणमिमांसा –

**मुद्दा क्र. १ व २ करीता –**

मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे अभिलेखावरील दाखल पुराव्याचे विवेचन करताना पुनरावृत्ती टाळण्यासाठी नमुद मुद्दे हे एकत्रित चर्चेस घेवून त्यांची एकत्रित कारणमिमांसा करण्यात येत आहे.

७. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपी सुकुमार किल्लेदार व तीन अनोळखी इसमांनी सदर महापालीकेच्या भुखंडावरील भराव घालण्याचे कामात अडथळा आणुन भराव टाकणारे डंपर क्र. एम एच ०४ सी ६९८५ व एम एच ०४ पी ४८८१ या क्रमांकांचे दोन डंपर व एम एच ४३ एफ २३१३ या क्रमांकाचे पिकअप वाहन पोलीस स्टेशनला आणुन जमा केले. त्यामुळे सदर बांधकाम थांबले.

८. वर नमुद बाब सिध्दतेकामी अभियोग पक्षातर्फे फिर्यादी शंकर रामचंद्र पवार, कार्यकारी अभियंता यांची साक्ष निशाणी ३१ वर नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या साक्षीत प्लॉट नं.१, सेक्टर १५ ए, सीबीडी बेलापूर भूखंड हा दिनांक १८.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालीकेचे मुख्यालय बांधणेकामी नवी मुंबई महानगरपालीकेला हस्तांतरीत झाला होता. सदर इमारत बांधकामाची निविदा मागविण्यात आली होती व त्यानुसार सदर काम हे आय. व्ही. आर. सी. एल. कंपनी यांना देण्यात आले होते. त्यानुसार दिनांक ३१.०३.२००७ रोजी सदर भूखंडावर आय. व्ही. आर. सी. एल. कंपनीतर्फे भराव टाकण्याचे काम चालू होते. त्यानंतर सदर कंपनीचे अभियंता श्री पेडणेकर यांनी कनिष्ठ अभियंता श्री विवेक मुळे यांना दूरध्वनीवरुन कळविले की, सदर साईटवरचे दोन डंपर व एक पिकअप व्हॅन ही वाहने आरोपी व त्याचे तीन साथीदार यांनी पोलीस स्टेशनला घेवून गेले. त्यानंतर विवेक मुळे यांनी त्यांना सदर घटनेबाबतची माहिती दूरध्वनीद्वारे कळविली. त्यानंतर सदर कनिष्ठ अभियंता विवेक मुळे तसेच उप अभियंता सुबोध मुळे यांच्यासह त्यांनी बांधकामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जावुन पाहणी केली असता तेथे काम बंद असल्याचे

आढळुन आले. त्यांनतर ते एनआरआय सागरी पोलीस स्टेशनला गेले व तेथे त्यांना दोन डंपर व एक पिक अप व्हॅन उभे असल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार आरोपीविरुध्द सरकारी कामात अडथळा आणल्याबाबतची फिर्याद निशाणी ३३ दाखल केली असे सांगितले.

९. वर नमुद साक्षीदार सा.क्र.१ यांच्या पुष्टयर्थ अभियोग पक्षाने उप–अभियंता सुबोध मुळे यांना सा.क्र.२ असे तपासले. सदर साक्षीदाराने त्यांच्या साक्षीत दिनांक ३१.०३.२००७ रोजी आय. व्ही. आर. सी. एल. कंपनीच्या इंजिनीयर यांनी त्यांचे कनिष्ठ अभियंता यांना फोन करुन आरोपी सुकुमार किल्लेदार व त्याच्या सहका–यांनी सदर काम बंद केले असे सांगितले. त्यानुसार त्यांनी प्रत्यक्ष बांधकामाच्या ठिकाणी जावुन पाहणी केली असता ते काम बंद असल्याचे त्यांना आढळुन आले असे सांगुन सा.क्र.१ यांच्या कथनास पुष्टी दिली.

१०. वर नमुद सा.क्र.१ व सा.क्र.२ यांच्या पुराव्याचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता असे आढळुन येते की, प्रस्तुत दोन्ही साक्षीदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसुन त्यांना घटनेबाबतची माहिती ही कनिष्ठ अभियंता विवेक मुळे यांच्याकडून दूरध्वनीवरुन कळविण्यात आली असे आढळून येते. नमुद परिस्थतीत प्रस्तुत साक्षीदारांना घटनेबाबतचे ज्ञान हे ऐकीव माहितीच्या आधारावरील असल्याचे आढळुन येते. अशा परिस्थितीत सा.क्र १ व २ यांचा पुरावा हा "ऐकीव पुरावा" असल्यामुळे तो कायदयानुसार विचारात घेता येणार नाही.

११. अभियोग पक्षाने त्यांच्या प्रकरण पुष्ठयर्थ पुढे तपास अधिकारी संभाजी हरी साळोखे यांना सा.क्र.३ असे तपासले. त्यांनी त्यांच्या साक्षीत प्रस्तुत प्रकरणाची फिर्याद प्राप्त झाल्यानंतर त्यांनी गुन्हा नोंदविला. त्यानंतर त्यांनी घटनास्थळाला भेट देवून घटनास्थळ पंचनामा निशाणी ४१ तयार केला. त्याचप्रमाणे त्यांनी प्रकरणा संदर्भातील कागदपत्रे आर्टीकल अ ते ड गोळा केली तसेच नि.क्र.३२ वरील अधिसुचना मिळविली. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविले. एकूण तपासाअंती आरोपीने फिर्यादी

लोकसेवकाच्या कामात अडथळा निर्माण केला असे त्यांना आढळुन आले असे जरी सांगितले तरी मुळात वर नमुद चर्चिल्यानुसार सदर बाबी सिध्दतेकामी आवश्यक असा संयुक्तिक व वस्तुनिष्ठ पुरावा परंतु अभियोग पक्ष अभिलेखावर दाखल करु शकले नाही. नमुद परिस्थितीत प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष ही केवळ औपचारिक स्वरुपाची ठरते.

१२. येथे महत्त्वाचे नमुद करावयाचे म्हणजे अभियोग पक्षाच्या कथनानुसार नमुद घटना ही दिनांक ३१.०३.२००७ रोजी घडली. परंतु सदर घटनेची फिर्याद ही दिनांक ०६.०४.२००७ रोजी अशा विलंबाने दाखल झाल्याचे आढळुन येते. सदर झालेला विलंब हा ब–याच कालावधीचा असा दिसून येतो व त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण अभियोग पक्षातर्फे देण्यात आले नाही.

१३. सरतेशेवटी इथे महत्त्वाचे नमुद करावयाचे म्हणजे प्रस्तुत प्रकरणात आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३५३ नुसार दंडीत गुन्हयाचा अपराध केला असा त्याचेवर आरोप आहे. मुळात सदर गुन्हा सिध्दतेकामी पिडीत व्यक्ती ही लोकसेवक असावयास हवी. प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळी आय. व्ही. आर. सी. एल. कंपनीचे अभियंता श्री पेडणेकर–पिडीत हे भराव घालण्याचे काम करीत असतांना आरोपीताने सदर ठिकाणावरुन त्यांचे दोन डंपर व एक पिक अप वाहन अशी वाहने पोलीस स्टेशनला नेवून त्यांच्या कामकाजात अडथळा निर्माण केला असे अभियोग पक्षाचे कथन आहे. मुळात सदर अडथळा ज्या व्यक्तीच्या कामकाजात झाला ते खाजगी कंत्राटदाराचे अभियंता होते म्हणजेच लोकसेवक नव्हते. एखादी खाजगी कंत्राटदार वा त्याचे कर्मचारी जरी शासकीय कामकाज करीत असले तरी ते भारतीय दंड संहिता कलम २१ नुसार लोकसेवकाच्या व्याख्येत येत नाहीत. त्यामुळे अशा खाजगी कंत्राटदारास वा त्याच्या कर्मचा–यास एखादे शासकीय कामकाज करतांना कोणी अडथळा आणला म्हणून तसा अडथळा आणणा–या व्यक्तीने भारतीय दंड संहिता कलम ३५३ नुसार दंडीत गुन्हयाचा अपराध केला असे म्हणता येणार नाही.

१४. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३४१ नुसार दंडित अपराध केल्याबाबतचा आरोप करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणातील आरोपांचे स्वरुप पाहता, आरोपीताने आय. व्ही. आर. सी. एल. कंपनीच्या अभियंत्याला ते नवी मुंबई महानगरपालीका इमारतीच्या बांधकामाचे निरीक्षण करीत असतांना सदर कामकाजाची डंपर व पिकअप वाहने तेथून नेवून पोलीस स्टेशनला जमा केली व त्यायोगे चुकीच्या पध्दतीने त्यांना कामकाज करण्यापासुन रोखले वा प्रतिबंधित केले. जर एखादया खाजगी कंत्राटदाराला नियमानुसार देण्यात आलेले काम करण्यापासुन एखादयाने जबरदस्तीने वा चुकीच्या पध्दतीने रोखले वा त्यास अडथळा निर्माण केला तर तो भारतीय दंड संहिता कलम ३४१ अंतर्गत गुन्हा ठरू शकतो कारण त्याला नियुक्त केलेले काम करण्याचा कायदेशीर अधिकार आहे. परंतु येथे महत्त्वाचे नमुद करावयाचे म्हणजे प्रस्तुत प्रकरणात ज्या व्यक्तीस म्हणजेच सदर खाजगी कंत्राटदाराचे अभियंता श्री पेडणेकर यांना आरोपीने जबरदस्तीने वा चुकीच्या पध्दतीने रोखले असा आरोप आहे त्या महत्त्वाच्या साक्षीदारास परंतु अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आले नाही. एवढेच नव्हे तर सदर बाब सिध्दतेकामी इतर कोणताही संयुक्तिक वा पुष्टयर्थ पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल केला नाही. नमुद वस्तुस्थिती व परिस्थितीत आरोपीने दोषारोपित गुन्हा केला असे म्हणता येणार नाही.

१५. वर नमुद वस्तुस्थिती व परिस्थितीत व एकूण चर्चेअंती मी असे ठरवितो की, साक्षीदार रवि सदाशिव पेडणेकर, अभियंता हे लोकसेवक म्हणून कर्तव्य बजावत असतांना व त्यांच्या कर्तव्याचा भाग म्हणून नवी मुंबई महानगरपालीकेच्या इमारत बांधकामाच्या ठिकाणी भराव घालण्याचे काम करीत असतांना आरोपी सुकुमार अन्नाप्पा किल्लेदार याने सदर कामास प्रतिबंध करुन ते काम बंद पाडले व सदर बांधकामाच्या ठिकाणावरील कामकाजाची वाहने– एम एच ०४ सी ६९८५ व एम एच ०४ पी ४८८१ या क्रमांकांचे दोन डंपर व एम एच ४३ एफ २३१३ या क्रमांकाचे पिकअप वाहन जोरजबरदस्तीने तेथून घेवून गेले व त्यायोगे सदर साक्षीदार हे लोकसेवक म्हणून कर्तव्य बजावत असतांना त्यांना रोखण्याच्या हेतूने त्यांच्या

कर्तव्याच्या कायदेशीर पालनात फौजदारी बळजबरी केली व त्यांच्या कामास चुकीच्या पद्धतीने प्रतिबंध केला वा रोखले ही बाब अभियोग पक्ष निर्विवादपणे सिध्द करु शकले नाही. करीता मुद्दा क्र.१ व २ वर मी माझा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन त्या आधारावर आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरेल अशा निष्कर्षास येवुन पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## – आदेश –

१ आरोपी नामे **सुकुमार अन्नाप्पा किल्लेदार** यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २३५ (१) अन्वये भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३५३, ३४१ अन्वये दंडीत अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र आणि जामीन कदबा रद्द करण्यात येतात.

३ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७–ए नुसार रक्कम रुपये २५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र आणि जामीन कदबा सादर करावा.

४ जप्त मुद्देमाल–झेरॉक्स कागदपत्रे आर्टीकल अ ते ड ही मुल्यहीन असल्यामुळे ते अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

दिनांक ०४/०७/२०२५
बेलापुर

सही/–
( मकरंद र.मांडवगडे )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बेलापुर.